# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र
# दिनांक - 11/05/2020 ते
# दिनांक - 20/05/2020

राजपत्रातील ०६ भाग –

| | |
|---|---|
| भाग – ०१ | **बदली /नेमणुक /पदोन्नती** |
| भाग – ०२ | **रजा** |
| भाग – ०३ | **वेतन/भत्ते / रोखिकरण** |
| भाग – ०४ | **बक्षिस / मानधन** |
| भाग – ०५ | **शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती** |
| भाग – ०६ | **प्रशिक्षण व इतर** |

---

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( एम. एम. बागवान )
पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

प्रति,

प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ :– सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे www.yavatmalpolice.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर GAZETTE या मथळयाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक पोस्टे./उपविपोअ./अधिकारी यांचे E - Mail वरती पाठवावे.

# भाग १ - बदली /नेमणुक /पदोन्नती

3705

जावक क्रमांक :- पोअय/आलि-80 सी/पदोन्नती/पोहवा-सपोउपनि/ /2020
पोलीस अधीक्षक यवतमाळ, यांचे कार्यालय एल.आय.ची चौक यवतमाळ
दूरध्वनी क्रमांक :- 07232-256700 फॅक्स नंबर :- 07232-256710
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
यवतमाळ, दिनांक :- 1 MAY 2020

## आ दे श

या कार्यालयाचे आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस हवालदार यांना सहायक पोलीस उपनिरीक्षक या पदावर वेतन संरचना 29200-92300 मध्ये जेष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गातुन खालील नमुद अटिंचे अधिन राहुन निवळ तात्पुरत्या स्वरुपात दिनांक 04/05/2020 पासुन पदोन्नती देण्यात येत आहे. पदोन्नती नंतर ते सद्या ज्या ठिकाणी कार्यरत आहेत त्याच ठिकाणी कार्यरत राहतील.

सदर पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपात, सेवाजेष्ठतेनुसार खुला प्रवर्गातील रिक्त पदावर असल्याने मा.सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 मधील निर्णयाच्या आधिन राहुन देण्यात येत आहे.

| अ.क्र | बंन | पदनाम | पोलीस कर्मचारी यांचे नाव | पदोन्नतीचा प्रवर्ग | नेमणुक |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 232 | पोहवा | सोमेश्वर कुमरे | खुला जेष्ठतेनुसार | पो.स्टे वणी |

तसेच सदरहु आदेश हे शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-2017/प्र.क्र312A/16 ब, दिनांक 18/10/2017 व दिनांक 19/12/2017 मध्ये नमुद केल्यानुसार मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी याचीका क्रमांक 2797/2015 मध्ये दिनांक 04/08/2017 रोजी दिलेल्या निर्णयानुसार राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका डायरी क्रमांक 33151/2017 दाखल केलेली आहे. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगिती कालावधीत, राज्य शासनाच्या वतीने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुमती याचिका डायरी क्रमांक 33151/2017 तसेच विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक 28306/2017 वर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुन, शासन निर्णय सा.प्र.वि.क्र बीसीसी-2001/1887/प्र.क्र.64/01/16-ब दिनांक 25/05/2004 मधील तरतुदीनुसार पदोन्नतीमध्ये आरक्षण न देता तुर्तास शासन पत्र साप्रवि दिनांक 29/12/2017 प्रमाणे पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार भरण्यात येत आहे.

सदर पदोन्नती हि संपुर्णतः तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने मा.सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 मधील निर्णयाच्या आधिन राहुन देण्यात येत असल्याने न्यायनिर्णय व शासनाचे आदेशानुसार दिलेली पदोन्नती कोणत्याही वेळी रद्द करुन मुळ पदावर पदावनत करण्यात येईल.

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक वाशिअ-1214/प्र.क्र 26/11 दिनांक 02/06/2014 अन्वये दिलेल्या निर्देशानुसार सन 2020-2021 च्या वित्तीय वर्षाची माहे मार्च 2020 अखेर पर्यंतची मत्ता व दायित्वची विवरणपत्रे अद्यापही सादर केले नसल्याने त्यांनी तात्काळ मत्ता व दायित्वाची विवरणरपत्रे सादर करण्यात यावी. आणि ती त्यांची स्वतःची जबाबदारी राहील जे कर्मचारी मत्ता व दायित्वची विवरणपत्रे या कार्यालयास सादर करणार नाही त्यांची पदोन्नती या कारणास्तव कोणत्याही वेळी रद्द करण्यात यईल याची संबधीतांनी नोंद घ्यावी.

वर नमुद पोलीस कर्मचारी यांना आता निलंबित केले असेल किंवा त्यांच्या विरुध्द नव्याने गंभीर कसुरी बाबत विभागीय चौकशी प्रलंबित असेल किंवा न्यायालयात खटला चालु असेल किंवा न्यायालयाने दिलेल्या इतर निर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपील प्रलंबित असेल किंवा जर ते एखादी शिक्षा भोगत असतील तर असे निदर्शनास आल्यास त्यांना पदोन्नती न देता तात्काळ या कार्यालयास कळविण्यात यावे.

शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पीचवाय 1082/सी आर/1100 (2)/एसईआर-3 दिनांक 06/11/1984 अन्वये पदोन्नतीनंतरच्या पदावर वेतन निश्चिती करण्याबाबत विकल्प दयावयाचा असेल तो पदोन्नती दिल्याचे दिनांकापासुन 01 महिण्याच्या आत या कार्यालयास सादर करावा. वेतन निश्चिती करीता दयावयाचा विकल्प 01 महिणेचे आत या कार्यालयास प्राप्त न झाल्यास पदोन्नती पदावरील वेतन निश्चिती म.ना.सेवा (वेतन) नियम 1981 मधिल नियम 11(1)(ए) आणि शासन अधिसुचना, वित्त विभाग क्रमांक वेपुर 1209/प्र.क्र. 27/सेवा-9 दिनांक 22/04/2009 मधील नियम 13 (ब) (2) अन्वये पदोन्नतीचा दिनांक विचारात घेवुन करण्यात येईल.

वर नमुद पोलीस कर्मचारी यांना कळविण्यात येते की महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही/2015/प्र.क्र 303/का.12 दिनांक 12/09/2016 अन्वये जे कर्मचारी सदरची पदोन्नती नाकारणार आहेत अशा कर्मचाऱ्यांना दोन वर्षा पर्यंत त्यांना त्यांचे पदोन्नती करिता विचार करण्यात येणार नाही.

ज्या पोलीस कर्मचारी यांना पदोन्नती नाकारावयाची असेल त्यांनी 07 दिवसांचे आत प्रभारी अधिकारी यांचे मार्फतीने अर्ज या कार्यालयास सादर करावा.

" **पदोन्नती झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे पदोन्नती झाल्याबद्दल आमचे तर्फे अभिनंदन करण्यात येत आहे** "

(एम.राज कुमार)
पोलीस अधीक्षक यवतमाळ

प्रति,

ठाणेदार पो.स्टे वणी

02/ संबधित ठाणेदार/शाखा प्रमुख यांनी सदर पदोन्नतीचे आदेश सर्व पोलीस कर्मचारी यांचे समोर गणनेवर वाचुन दाखवावे तसेच ज्या पोलीस कर्मचाऱ्यांने पदोन्नती स्विकारलेली आहे त्या बाबतची नोंद हुद्दावार नोंदवही मध्ये घेवुन त्या बाबतचा सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत :- अपर पोलीस अधिक्षक यवतमाळ/पोलीस उपअधिक्षक (मुख्या)/कार्यालय अधिक्षक/प्रमुख लिपीक लेखा शाखा पत्रव्यवहार शाखा, वि.चौ शाखा, प्रबंधक शाखा/सहा.आस्थापना लिपीक 2/वेतन लिपीक-1/राजपत्र लिपीक/ विभागीय चौकशी लिपीक यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहिस्तव

महाराष्ट्र पोलीस

जावक क्रमांक :- पोअय/आलि-80 सी/पदोन्नती-रद्द/3704/2020
पोलीस अधीक्षक यवतमाळ, यांचे कार्यालय एल.आय.ची चौक यवतमाळ
दूरध्वनी क्रमांक :- 07232-256700 फॅक्स नंबर :- 07232-256710
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
यवतमाळ, दिनांक :- 11 MAY 2020

संदर्भ :- **01)** पोअय/आली-80-सी/पदोन्नती/पोहवा ते सपोउपनि/3676/2020 दिनांक 05/05/2020

**आ दे श**

या कार्यालयाचे वर नमुद संदर्भिय आदेशान्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्या नुसार पदोन्नती देण्यात आलेली होती.

| अ.क्र | पोलीस कर्मचारी यांचे नाव, व बंन | सध्याचे पद | पदोन्नतीचे पद | नेमणुक |
|---|---|---|---|---|
| 01 | पोहवा/841 किसन सुनकलवार | पोहवा | सपोउपनि | वडकी |

परंतु क्रमांक 33151/2017 तसेच विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक 28306/2017 वर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुन, शासन निर्णय सा.प्र.वि.क्र बीसीसी-2001/1887/प्र.क्र.64/01/16-ब दिनांक 25/05/2004 मधील तरतुदीनुसार पदोन्नतीमध्ये आरक्षण न देता तुर्तास शासन पत्र साप्रवि दिनांक 29/12/2017 नुसार सदर कर्मचारी सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती देणे बाबत निर्देश असल्याले पोहवा/841 किसन सुनकलवार नेमणुक पो.स्टे वडकी यांची नेमणुक दिनांक 21/09/1990 असुन सध्या 1989 मध्ये भरती झालेले पोलीस कर्मचारी हे पदोन्नती करिता पात्र असल्याने त्यांना देण्यात आलेली सपोउपनि पदाची पदोन्नती या आदेशान्वये रद्द करण्यात येत आहे. तसेच त्यांची नियुक्ती दिनांक 21/09/1990 चे जेष्ठतेनुसार त्यांना सपोउपनि पदाची पदोन्नती देण्यात येईल.

(एम.राज कुमार)
पोलीस अधीक्षक यवतमाळ

प्रति,

ठाणेदार पो.स्टे वडकी

प्रत :- वरील नमुद संबधित पोलीस कर्मचारी- मार्फत राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय यवतमाळ

प्रत :- अपर पोलीस अधिक्षक यवतमाळ/पोलीस उपअधिक्षक (मुख्या)/कार्यालय अधिक्षक/प्रमुख लिपीक लेखा शाखा पत्रव्यवहार शाखा, वि.चौ शाखा, प्रबंधक शाखा/सहा.आस्थापना लिपीक 1,/वेतन लिपीक-1/राजपत्र लिपीक/विभागीय चौकशी लिपीक यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहिस्तव

# भाग २ - रजा

क्रमांक :- पोअय/सआलि-3/अर्जीत रजा-पो.कर्मचारी-2020-2021/3208/2020 यवतमाळ दिनांक :- 12 MAY 2020

**आ दे श**

खालील नमुद कर्मचारी यांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्या प्रमाणे त्यांची रजा,म.ना.सेवा (रजा) नियम 1981 मधील नियम 50 अन्वये सन 2020 - 2021 करिता त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे अर्जीत रजा मंजूर करण्यांत येत आहे.

| अ.क्र | पदनाम बन | मंजुर रजा व दिवस | कारण | नेमणूक |
|---|---|---|---|---|
| 1 | पोना/1037 धिरज जाधव | 30 दिवस | धार्मीक कामा करीता | जि.वा. उप शाखा पुसद |
| 2 | पोशि/199 प्रफुल तामस्कर | 30 दिवस | धार्मीक कामा करीता | जि.वा. उप शाखा पुसद |
| 3 | पोशि/516 संतोष गजभार | 30 दिवस | धार्मीक कामा करीता | जि.वा. उप शाखा पुसद |
| 4 | मपोशि/2546 बबिता राठोड | 30 दिवस | स्वताचे लग्ना करीता | मो.प.वि. यव. |
| 5 | मपोशि/ 1417 रुपाली धोंगडे | 30 दिवस | मुलाचे संगोपना करीता | अवधुतवाडी |
| 6 | मपोशि/1164 मनिषा मुंडेकर | 30 दिवस | मुलाचे संगोपना करीता | अवधुतवडी |

नमुद पोलीस कर्मचारी यांना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पाहुन त्यांनी तसेच कामाची निकट पाहुन आळी पाळीने रजेवर सोडावे व रजेवर सोडल्याची तारीख न चूकता या कार्यालयास कळवावी.

( एम. एम. बागवान )
पोलीस उप अधिक्षक (मुख्या.)
पोलीस अधिक्षक यवतमाळ यांचे करीता

प्रति,

सर्व संबंधित ठाणेदार

प्रत, डिपीजी लिपीक यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहिस्तव

# भाग ३ - वेतन/भत्ते / रोखिकरण

क्र. पोअय/डीपी/३१बी/ज्ञापन/श्रीमती राजगडकर+०७/शा.नि. वसुली/ 3843 /२०२०
पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे कार्यालय, एल.आय.सी. चौक यवतमाळ
दुरध्वनी क्रमांक:-०७२३२-२५६७०० फॅक्स क्रमांक:-०७२३२-२५६७१०
ई मेल आय डी :- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 20 MAY 2020

## आदेश

या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/डीपी/३१बी/ज्ञापन/श्रीमती राजगडकर+०७/शा.नि. वसुली/१८१/२०२०, दिनांक २७/०१/२०२० अन्वये नमुद मंत्रालयीन कर्मचारी यांचे वेतनातुन घरभाडे भत्याची रक्कम वसुल करण्याबाबत आदेशीत करण्यात आलेले आहे. परंतु श्री. अनिल कांबळे, क.श्रे.लि. यांचे वेतनातुन नियमित घरभाडे भत्याची रक्कम कपात होत असल्यामुळे त्यांचे नाव वगळुन खालील प्रमाणे सुधारीत आदेश निर्गमीत करण्यात येत आहे.

खालील नमुद मंत्रालयीन कर्मचारी हे त्यांचे नावासमारे दर्शविलेल्या तारखेपासुन पोलीस वसाहत यवतमाळ मधील शासकीय निवासस्थानामध्ये राहत असुन वेतनामध्ये नियमीत घरभाडे भत्ता घेत आहेत. शासकीय निवासस्थान वाटप करण्यात आलेल्या शासकीय कर्मचारी यांना नियमानुसार घरभाडे भत्ता अनुज्ञेय नाही. करिता नमुद मंत्रालयीन कर्मचारी **यांचे वेतनातुन घरभाडे भत्ता बंद करण्यात येवुन त्यांना शासकीय निवासस्थान वाटप करण्यात आलेल्या दिनांकापासुन प्रदान करण्यात आलेला घरभाडे भत्याची रक्कम त्यांचे वेतनातुन प्रथम प्राधान्याने वसुल करण्यात यावी.**

| अ.क्र. | मंत्रालयीन कर्मचारी यांचे नाव व पदनाम | नेमणुक | निवासस्थान क्रमांक | निवासस्थान वाटप करण्यात आल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | श्रीमती सुषमा राजगडकर, कनिष्ठ श्रेणी लिपीक | पत्रव्यवहार शाखा | कवेलु निवासस्थान क्रमांक १०६ | दिनांक १४/०८/२०१७ |
| २. | श्रीमती सरीता सुर्यवंशी, कनिष्ठ श्रेणी लिपीक | प्रबंधक शाखा | नविन बिल्डींग क्रमाक ११, निवासस्थान क्रमांक १६४ | दिनांक ०१/१०/२०१४ |
| ३. | श्री. सुशिल मुदावणे कनिष्ठ श्रेणी लिपीक | लेखा शाखा | नविन बिल्डींग क्रमाक ०४, निवासस्थान क्रमांक ५५ | दिनांक २०/०६/२०१६ |
| ४. | श्री. परमेश्वर देशमुख, वरिष्ठ श्रेणी लिपीक | प्रबंधक शाखा | जुनि इमारत क्रमाक ०२ निवासस्थान क्रमांक ५५ | दिनांक ०५/१०/२०१८ |
| ५. | श्री. अंकुश ठाकरे, कनिष्ठ श्रेणी लिपीक | कर्मचारी आस्थापना शाखा | नविन बिल्डींग क्रमाक ०३, निवासस्थान क्रमांक ४१ | दिनांक २०/१०/२०१८ |
| ६. | श्री. पंकज गिरी, कनिष्ठ श्रेणी लिपीक | कर्मचारी आस्थापना शाखा | पो.स्टे. यवतमाळ ग्रामीण येथील निवासस्थान क्रमांक १०१ | दिनांक १६/०६/२०१८ |
| ७. | श्री. अनिल पेन्दोर, वरिष्ठ श्रेणी लिपीक | लेखा शाखा | निवासस्थान क्रमांक ०१ | माहे ०१/२०१५ |

**( एम. राज कुमार )**
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

**प्रति,**

**वेतन लिपीक - ०२,** लेखा शाखा, पो.अ. कार्या. यवतमाळ.

२/- **वरिल नमुद मंत्रालयीन कर्मचारी यांचे वेतनापासुन घरभाडे भत्ता वसुल करुन त्याबाबतचा पुर्तता अहवाल पोउपअधि (मुख्या) यवतमाळ यांना सादर करण्यात यावा.**

**प्रत :-** सर्व संबधीत लिपीक.

**मार्फत :- प्रमुख लिपीक,** लेखा शाखा, पत्रव्यहार शाखा, कर्मचारी आस्थापना शाखा व प्रबंधक शाखा पो.अ.कार्या. यवतमाळ.

**प्रत :-** राजपत्र लिपीक/रापोनि पो.मुख्या यवतमाळ/ कार्यालय अधीक्षक /पोउपअधि(मुख्या) यांना माहीती व कार्यवाहीस.

क्रमांकः- पोअय/ डिपी/३१ बी/लिपीक कर्मचारी /शा.नि.वसुली/अं.आ./ 3844 /२०२० यवतमाळ दिनांकः- 20 MAY 2020

## अंतिम आदेश

**वाचा** :- १) पोअय/डीपी/३१-बी/ज्ञापन/श्रीमती राजगडकर/शा.नि./११८५/२०२०, दिनांक २७/०१/२०२०.
२) पोअय/डीपी/३१-बी/ज्ञापन/श्रीमती सुर्यवंशी/शा.नि./११९२/२०२०, दिनांक २७/०१/२०२०.
३) पोअय/डीपी/३१-बी/ज्ञापन/श्री. मुदावणे/शा.नि./११८६/२०२०, दिनांक २७/०१/२०२०.
४) पोअय/डीपी/३१-बी/ज्ञापन/श्री परमेश्वर देशमुख/शा.नि./११९१/२०२०, दिनांक २७/०१/२०२०.
५) पोअय/डीपी/३१-बी/ज्ञापन/श्री अकुंश ठाकरे/शा.नि./११८७/२०२०, दिनांक २७/०१/२०२०.
६) पोअय/डीपी/३१-बी/ज्ञापन/श्री. पंकज गिरी/शा.नि./११८९/२०२०, दिनांक २७/०१/२०२०.
७) पोअय/डीपी/३१-बी/ज्ञापन/श्री.अनिल कांबळे/शा.नि./११८८/२०२०, दिनांक २७/०१/२०२०.
८) पोअय/डीपी/३१-बी/ज्ञापन/श्री. अनिल पेन्दोर/शा.नि./११९०/२०२०, दिनांक २७/०१/२०२०.

खालील नमुद मंत्रालयीन कर्मचारी यांना पोलीस वसाहत यवतमाळ येथील शासकीय निवासस्थान वाटप करण्यात आले असुन त्यांना घरभाडे भत्ता अनुज्ञेय नसतांना सुध्दा ते त्यांचे वेतनामध्ये नियमीत घरभाडे भत्ता घेत असुन त्यांनी कर्तव्यात केलेल्या कसुरी प्रकरणी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील ) १९७९ नियम ५ (१) ( एक) मधील तरतुदी नुसार '**ठपका ठेवणे**' ( **Censured** ) ही शिक्षा देण्यात येत आहे.

१) व.श्रे.लि. परमेश्वर देशमुख
२) व.श्रे.लि. अनिल पेन्दोर
३) क.श्रे.लि. श्रीमती सुषमा राजगडकर
४) क.श्रे.लि. श्रीमती सरीता सुर्यवंशी
५) क.श्रे.लि. सुशिल मुदावणे
६) क.श्रे.लि. अंकुश ठाकरे
७) क.श्रे.लि. पंकज गिरी

**( एम. राज कुमार )**
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

**प्रति,**
उपरोक्त मंत्रालयीन कर्मचारी.

**मार्फत :- प्रमुख लिपीक,** लेखा शाखा, पत्रव्यहार शाखा, कर्मचारी आस्थापना शाखा व प्रबंधक शाखा पो.अ.कार्या. यवतमाळ.

२/- **सोबत अंतीम आदेशाच्या २ प्रती पाठविण्यांत येत असुन एक प्रत संबंधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवून विनाविलंब या कार्यालयास सादर करावी.**

**प्रत :-** मंत्रालयीन कर्मचारी लिपीक/डिपीजी लिपीक यांना उचित कार्यवाहीस.